# प्रेसनोट दि.०८/०६/२०१९

## सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे

सिंहगडरोड पोलीस स्टेशन वडगाव मार्शल कर्मचारी सचिन तुपसौंदर व सुहास मोरे यांची उत्कृष्ट कामगिरी

---

दि. १८/०५/२०१९ रोजी रात्रौ १०.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे कुलदिप रामभारत सिंह, वय २७ वर्षे, धंदा-पानटपरी चालक, रा. चाळ नं. ७, रुम नं. ३१८, साने गुरुजी नगर, पीएमसी कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ३०. व त्यांचा कामगार गौरीशंकर सिंह असे नेहमीप्रमाणे त्यांचे प्रदिप पान शॉप, विजया चेंबर्स, हिंगणे खुर्द, पुणे या पानटपरीवर असताना त्यांचे तोंड ओळखीचा इसम नामे किरण उजानी, रा. सिंहगडरोड, पुणे हा त्याचे तीन मित्रांसह त्यांचे पानटपरीवर आला. त्याने फिर्यादी यांना ०५ स्पेशल सिगारेट मागीतले व सिगारेटचे पैसे दिले नाहीत. त्यामुळे फिर्यादी यांनी त्याला आत्ताचे व पुर्वीचे उधारीचे राहीलेले पैसे मागीतले असता, त्याने पैसे देणार नाही, तुला काय करायचे ते कर असे म्हणुन फिर्यादी यांना वाईट-वाईट शिवीगाळ करुन फिर्यादी नामे कुलदिप रामभारत सिंह व त्यांचा भाऊ संदिप सिंह यांस हाताने धक्काबुक्की केली असता फिर्यादी व त्यांचा भाऊ यांनी विरोध केला असता किरण उजानी व त्याचे मित्रांपैकी एकाने फिर्यादी यांचे डोक्यावर बिअरची बाटली मारुन त्यांना गंभीर जखमी केले म्हणुन फिर्यादी यांनी त्यांचेविरुध्द तक्रार दिल्याने सिंहगडरोड पो.स्टे. गुन्हा रजि.नं. ३८४/२०१९ भादंवि कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याचा तपास पोहवा २४२४ पी.डी.कडु हे करीत आहेत.

**दाखल गुन्हयाचा पुढील तपास चालु असताना दि. ०७/०६/२०१९ रोजी दाखल गुन्हयातील पाहीजे असलेला आरोपी नामे दिनेश मनोहर दाखले, वय २५ वर्षे, रा. स.नं. २३, तुकाईनगर, राजीवगांधी वसाहत, हिंगणे खुर्द, पुणे यास वडगाव मार्शलचे पोलीस कर्मचारी पोशि ८७४४ सचिन तुपसौंदर व पोशि १०११४ सुहास मोरे यांनी त्यांचे बातमीराचे मार्फतीने शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन सदर आरोपीस दि. ०७/०६/२०१९ रोजी ११.३० वा. दाखल गुन्हयात अटक करुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे.**